# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे

आयएस्ओ ९००१:२००८ मानांकित संस्था

## प्रवेश माहिती पुस्तिका २०१६-१७

# महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठामधील आचार्य पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश


१३२/ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे – ४११ ००७

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
संकेतस्थळ : www.mcaer.org

दूरध्वनी : (०२०) २५५३७६८८.
फॅक्स : (०२०) २५५३७६८८
: (०२०) २५५३ ३७६४.



दि.२९ सप्टेंबर,२०१६ रोजी प्रकाशित.


(प्रवेश प्रक्रियेविषयक कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास इंग्रजी माहिती पुस्तिका ग्राह्य धरण्यात येईल.)

## महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे-४११ ००७.
### आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

| पदाधिकारी | नाव | दूरध्वनी क्रमांक | फॅक्स क्रमांक |
|---|---|---|---|
| कुलपती व राज्यपाल, महाराष्ट्र राज्य | महामहिम सी. विद्यासागर राव | ०२२-२३६३२६६० | ०२२-२३६३३२७२ |
| कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रति-कुलपती व अध्यक्ष, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे | मा. श्री. पांडुरंग फुंडकर | ०२२-२२०२५०१४ | ०२२-२२०२४८७३ |
| उपाध्यक्ष | मा. डॉ. राम खर्चे | ०२०-२५५३७४८१ | ०२०- २५५३३७६४ |
| महासंचालक | डॉ. श्रीकांत काकडे | ०२०-२५५३७२५७ | ०२०- २५५३३७६४ |
| संचालक (शिक्षण) | डॉ. श्रीकांत काकडे | ०२०- २५५३७६८८ | ०२०- २५५३७६८८ |
| संचालक (विस्तार शिक्षण व साधनसामुग्री विकास) | डॉ. विरेंद्र गोंगे | ०२०- २५५३४५७७ | ०२०- २५५३३७६४ |
| संचालक (संशोधन) | डॉ. विरेंद्र गोंगे | ०२०- २५५३७६८८ | ०२०- २५५३७६८८ |
| सहसंचालक (प्रशासन) | डॉ. हरिहर कौसडीकर | ०२०-२५५३१२०८ | ०२०-२५५३३७६४ |
| सहसंचालक (वित्त) | डॉ. हरिहर कौसडीकर | ०२०- २५५३२७२६ | ०२०- २५५३३७६४ |

**संकेतस्थळे:** www.mcaer.org & maha-agriadmission.in, **email:** mcaer@rediffmail.com,edn_mcaer@rediffmail.com

### महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी ४१३ ७२२ जि. अहमदनगर

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. के. पी. विश्वनाथा | ०२४२६-२४३२०८ | ०२४२६-२४३३०२ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. भि. रा. उल्मेक | ०२४२६-२४३२२७ | ०२४२६-२४३२२७ |
| ३ | कुलसचिव | श्रीमती पल्लवी निर्मल | ०२४२६-२४३२१६ | ०२४२६-२४३२१६ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्री. भि. सो. पालवी | ०२४२६-२४३२१५ | ०२४२६-२४३२१६ |

**संकेतस्थळ:** mpkv.mah.nic.in **email:** dracdmpkv2013@rediffmail.com

### डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला ४४४ १०४

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. र. गो. दाणी | ०७२४-२२५८३६५ | ०७२४-२२५८२१९ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. वि. म. भाले | ०७२४-२२५८०९३ | ०७२४-२२५८०९३ |
| ३ | कुलसचिव | डॉ. प्र. रा. कडू | ०७२४-२२५८३७२ | ०७२४-२२५८३७२ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | डॉ. श्री. के. अहेरकर | ०७२४-२२५८३४८ | ०७२४-२२५८३४८ |

**संकेतस्थळ:** www.pdkv.ac.in **email :-** dyracad@pdkv.ac.in

### वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी ४३१ ४०२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. बी. व्यंकटेश्वरलू | ०२४५२-२२३००२ | ०२४५२-२२३५८२ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. अ. श्री. ढवण | ०२४५२-२२२६८७ | ०२४५२-२२२६८७ |
| ३ | कुलसचिव | श्री. दि. शि. कच्छवे | ०२४५२-२२९७५५ | ०२४५२-२२९७५५ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्री. ह. लि. भांगे | ०२४५२-२२७९०० | ०२४५२-२२७९०० |

**संकेतस्थळ:** mkv2.mah.nic.in **email:** reg_mau@rediffmail.com

### डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली ४१५ ७१२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. तपस भट्टाचार्य | ०२३५८-२८२०६४ | ०२३५८-२८२०७४ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. र. ग. बुरटे | ०२३५८-२८४३०८ | ०२३५८-२८४३०८ |
| ३ | कुलसचिव | श्री. ज. वि. देशपांडे | ०२३५८-२८२०६५ | ०२३५८-२८३०६५ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्री. प्र. अ. यादव | ०२३५८-२८२४११ विस्तार १२५ | ०२३५८-२८३९६३ |

**संकेतस्थळ:** www.dbskkv.org **email:** regrdbskkv@rediffmail.com

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे-४११ ००७.**

---------------------------------------------------------------

## प्रवेश माहिती पुस्तिका २०१६-१७

### महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठामधील आचार्य पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश

**प्रस्तावना :**

१.१ **महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (कृषी परिषद)** ही महाराष्ट्र कृषी विद्यापीठे, **अधिनियम, १९८३ चे कलम १२** अंतर्गत स्थापन झालेली **वैधानिक संस्था** आहे. **उक्त अधिनियमाच्या कलम १२ उपकलम ३ (जी) मधील तरतुदीनुसार कृषी परिषदेला प्राधिकृत करण्यात आल्यानुसार** राज्यातील कृषी विद्यापीठांमधील विविध पदवी प्रवेश प्रक्रियेसाठी सामायिक नियमावली तयार करण्यात आली आहे.

१.२ शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ (परिशिष्ट-'अे') अन्वये शासनाने, कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमामध्ये जागांचे आरक्षण, सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती व प्रवेश कार्यपध्दती निश्चित केली आहे. (१) नवीन शासकीय महाविद्यालये, शासकीय अनुदानित महाविद्यालये आणि विना अनुदानित महाविद्यालये सुरु करण्यास, (२) केंद्रीय प्रवेश प्रक्रिया विहित करण्यास व राबविण्यास (३) प्रवेशाकरिता अधिभार निश्चित करण्यास, प्रवेश करण्यास आणि (४) चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क व इतर शुल्क ठरविण्यास कृषी परिषदेला अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

१.३ कृषी परिषदेच्या दि.२२/०५/२०१३ रोजी संपन्न झालेल्या ८८ व्या बैठकीतील विषय क्र.१२ अन्वये मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि. ('केटीपीएल'), पुणे यांच्यावर सामायिक प्रवेश प्रक्रिया **'ऑनलाईन पध्दती'**ने राबविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## १.४ कृषी विद्यापीठांचे कार्यक्षेत्र :

| अ. क्र. | कृषी विद्यापीठाचे नाव | कार्यक्षेत्रांतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १. | **म**हात्मा **फु**ले **कृ**षी **वि**द्यापीठ,<br>राहुरी-४१३ ७२२, जि. अहमदनगर<br>**(मफुकृवि - राहुरी)** | **अहमदनगर**, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर |
| २ | **डॉ. पं**जाबराव **दे**शमुख **कृ**षी **वि**द्यापीठ,<br>अकोला-४४४ १०४.<br>**(डॉ.पंदेकृवि - अकोला)** | **अकोला,** अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर. |
| ३ | **व**संतराव **ना**ईक **म**राठवाडा **कृ**षी **वि**द्यापीठ,<br>परभणी-४३१ ४०२.<br>**(वनामकृवि - परभणी)** | **परभणी,** हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बीड, जालना व औरंगाबाद. |
| ४ | **डॉ. बा**ळासाहेब **सा**वंत **कों**कण **कृ**षी **वि**द्यापीठ, दापोली-४१५ ७१२.<br>जि. रत्नागिरी<br>**(डॉ. बासाकोकृवि - दापोली)** | **रत्नागिरी,** सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर, मुंबई शहर व मुंबई उपनगर. |

## १.५ व्याख्या :

### १.५.१ विद्यापीठ कोटा [‘U’ Quota]

ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे किंवा ज्या उमेदवाराच्या महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला आहे, आणि महाराष्ट्रातील संबंधित कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातून पात्रता परीक्षा उत्तीर्ण आहे. अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **’विद्यापीठ कोटा’ [‘U’ Quota]** असे संबोधण्यात यावे.

### १.५.२. महाराष्ट्र कोटा [‘M’ Quota]

ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे किंवा ज्या उमेदवाराच्या महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला आहे. अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **’महाराष्ट्र कोटा’ [‘M’ Quota]** असे संबोधण्यात यावे. यास्तव विद्यापीठ कोटयातील उमेदवार महाराष्ट्र कोटयाकरितासुध्दा पात्र आहेत.

**१.५.३ राज्याबाहेरील उमेदवारांसाठी कोटा [‘O.S.’ Quota]**

**प्रवेश घेण्यापूर्वी लगतच्या १० वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या उमेदवारांनी व ज्यांच्या आई- वडिलांनी महाराष्ट्रात निवास केला नसेल, अशा व्यक्ती** आणि ज्या व्यक्तींनी महाराष्ट्राव्यतिरिक्त देशातील इतर राज्यांचे अधिवास प्रमाणपत्र धारण केलेले असेल, अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **‘राज्याबाहेरील उमेदवारांसाठी कोटा’ [Other State-O.S. Quota]** असे संबोधण्यात यावे.

**१.५.४ जागेवर प्रवेश [Spot Admission]**

नियोजित ऑनलाईन प्रवेश फे-या संपल्यानंतर रिक्त झालेल्या / असलेल्या जागांवर प्रवेश मिळण्यासाठी संबंधित महाविद्यालय / संस्थेच्या ठिकाणी उमेदवाराने प्रत्यक्ष उपस्थित राहणे आणि उपस्थित उमेदवारांमधून आरक्षण व गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याच्या प्रक्रियेस **‘जागेवर प्रवेश’ [Spot Admission]** असे संबोधण्यात यावे. **जागेवर प्रवेशासाठीच्या प्रक्रियेच्यावेळी अनुपस्थित असलेला उमेदवार ’जागेवर प्रवेशा’साठी पात्र ठरणार नाही.**

**२. संस्था व आचार्य पदवी अभ्यासक्रमांचा तपशील :**

परिच्छेद २.१ येथे नमूद करण्यात आलेल्या आचार्य पदवी अभ्यासक्रमांच्या महाराष्ट्र [**‘M’ Quota**] व विद्यापीठ [**‘U’ Quota**] कोटयाकरिता इच्छुक उमेदवारांनी **एकच प्रवेश अर्ज सादर करावा. आचार्य पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण व परीक्षेचे माध्यम इंग्रजी राहील.**

**२.१ विद्याशाखा, कालावधी, गुणांक भार [Credit load] आणि पात्रता :**

आचार्य पदवी प्रवेश हे पूर्णतः गुणवत्ता आधारित असेल. महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळ यांच्याद्वारे चालू शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या संबंधित विषयातील आचार्य पदवी सामायिक प्रवेश परीक्षेचे गुण व अर्हता पदव्युत्तर पदवीचे गुण यांचे प्रमाण अनुक्रमे ७०:३० असे राहील. अधिभार / अतिरिक्त गुण देखील गणण्यात येतील.

| अ. क्र. | विद्याशाखा | कालावधी | श्रेयांक भार | पात्रता |
|---|---|---|---|---|
| १. | कृषी | ३ वर्षे (६ सत्रे) | ७० | महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठाच्या संबंधित विषयातील एम्.एस्सी.(कृषी) / एम्.एस्सी.(उद्यानविद्या) पदवी किंवा इतर कोणत्याही संबंधित कृषी विद्यापीठाची समकक्ष ठरविण्यात आलेली पदवी आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली कृषी / उद्यानविद्या विद्याशाखेच्या संबंधित विषयातील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| २. | गृहविज्ञान | ३ वर्षे (६ सत्रे) | ७० | महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठाच्या संबंधित विषयातील एम्.एस्सी. (गृहविज्ञान) पदवी किंवा इतर कोणत्याही संबंधित कृषी विद्यापीठाची समकक्ष ठरविण्यात आलेली पदवी आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली गृहविज्ञानच्या संबंधित विषयातील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ३. | मत्स्यविज्ञान | ३ वर्षे (६ सत्रे) | ७० | महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठाच्या संबंधित विषयातील एम्.एफ्.एस्सी. पदवी किंवा इतर कोणत्याही संबंधित कृषी विद्यापीठाची समकक्ष ठरविण्यात आलेली पदवी आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली मत्स्यविज्ञानच्या संबंधित विषयातील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ४. | अन्न तंत्रज्ञान | ३ वर्षे (६ सत्रे) | ७५ | महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठाची एम्.टेक्. (अन्न तंत्रज्ञान) पदवी किंवा इतर कोणत्याही संबंधित कृषी विद्यापीठाची समकक्ष ठरविण्यात आलेली पदवी आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली अन्नतंत्रज्ञानच्या संबंधित विषयातील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ५. | कृषी जैवतंत्रज्ञान | ३ वर्षे (६ सत्रे) | ७० | महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठाच्या संबंधित विषयातील एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) पदवी किंवा इतर कोणत्याही संबंधित कृषी विद्यापीठाची समकक्ष ठरविण्यात आलेली पदवी आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली कृषी जैवतंत्रज्ञान च्या संबंधित विषयातील सामायिक प्रवेश परीक्षा. |

| अ. क्र. | विद्याशाखा | कालावधी | श्रेयांक भार | पात्रता |
|---|---|---|---|---|
| ६. | कृषी अभियांत्रिकी | ३ वर्षे (६ सत्रे) | ७० | महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठाच्या संबंधित विषयातील एम्.टेक्. (कृषी अभियांत्रिकी) पदवी किंवा इतर कोणत्याही संबंधित कृषी विद्यापीठाची समकक्ष ठरविण्यात आलेली पदवी आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली कृषी अभियांत्रिकी विद्याशाखेच्या संबंधित विषयातील सामायिक प्रवेश परीक्षा. |

टिपः- संबंधित कृषी विद्यापीठाने विहित केलेले संबंधित विषयाच्या आराखडयातील कमतरता अभ्यासक्रम (Deficiency Courses) विद्यार्थ्याने पूर्ण करणे बंधनकारक राहील.

## २.२ इतर निकष-

(१) उमेदवाराने पदव्युत्तर परीक्षेमध्ये १०.०० बिंदू मापन पध्दतीत किमान ६.५ सीजीपीए मिळविला असावा.

(२) ४ बिंदू मापन पध्दतीनुसार मिळालेला सीजीपीए १० बिंदू मापनमध्ये रुपांतरीत करण्यासाठी खालीलप्रमाणे सूत्र वापरण्यात येईल.

वाय = १.५ + २ एक्स, जेथे एक्स = २ ते ३.५ आणि

वाय = ८.५ + ३ {एक्स (-) ३.५}, जेथे एक्स = ३.५१ ते ४.००

जेथे, वाय = १० बिंदू मापन आणि

एक्स = ४.०० बिंदू मापन

## २.३ आचार्य पदवी प्रवेश क्षमता

### *२.३.१ (अ) कृषी :*

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी | डॉ. पंदेकृवि, अकोला | वना मकृवि, परभणी | डॉ. बासाकोकृवि दापोली | |
| १. | कृषीविद्या | ६ | ३ | ३ | २ | १४ |
| २. | कृषी हवामानशास्त्र* | २ | -- | -- | -- | २ |
| ३. | मृद्शास्त्र व कृषी रसायनशास्त्र | ४ | ३ | ३ | २ | १२ |
| ४. | जैवरसायनशास्त्र | २ | -- | -- | -- | २ |
| ५. | कृषी वनस्पतीशास्त्र | | | | | |
| | (अ) वनस्पती शरीरशास्त्र** | ४ | २ | १ | २ | ९ |
| | (ब) अनुवंश व रोप पैदासशास्त्र | ६ | ३ | ३ | २ | १४ |
| | (क) बीज तंत्रज्ञान | ४ | -- | १ | -- | ५ |
| ६. | विस्तार शिक्षण | ४ | ३ | ३ | २ | १२ |

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी | डॉ. पंदेकृवि, अकोला | वना मकृवि, परभणी | डॉ. बासाकोकृवि दापोली | |
| ७. | कृषी अर्थशास्त्र | ४ | ३ | ३ | २ | १२ |
| ८. | कृषी कीटकशास्त्र | ६ | ३ | ३ | २ | १४ |
| ९. | वनस्पती रोगशास्त्र | ६ | ३ | ३ | २ | १४ |
| १०. | सूक्ष्मजीवशास्त्र | ४ | -- | -- | -- | ४ |
| ११. | पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र | | | | | |
| | (अ) पशुसंवर्धन | ४ | १ | २ | १ | ८ |
| | (ब) दुग्धशास्त्र | ४ | १ | १ | १ | ७ |
| १२. | उद्यानविद्या | | | | २ | २ |
| | (अ) फळशास्त्र | ४ | ४ | ३ | -- | ११ |
| | (ब) भाजीपाला शास्त्र | ४ | ४ | ३ | -- | ११ |
| | (क) फुलशेती व प्रांगण सुशोभिकरण आरेखन | -- | २ | १ | -- | २ |
| १३. | सिंचन जलव्यवस्थापन | २ | -- | -- | -- | २ |
| १४. | भू साधन व्यवस्थापन | -- | २ | -- | -- | २ |
| १५. | अन्न तंत्रज्ञान | २ | -- | -- | -- | २ |
| | **एकूण** | **७२** | **३७** | **३३** | **२०** | **१६२** |

* सदरचा अभ्यासक्रम कृषी महाविद्यालय, पुणे येथे शिकविला जातो.

** रोप शरीरशास्त्र या विषयातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची जागा अनुवंश व रोप पैदासशास्त्र या विषयासाठी वाटप करण्यात येईल.

## *(ब) गृहविज्ञान*

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| | | वनामकृवि, परभणी |
| १. | अन्न व पोषण | २ |

## *(क) मत्स्यविज्ञान*

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| | | डॉ. बासाकोकृवि, दापोली |
| १. | मत्स्यशेती | २ |
| २. | मत्स्य प्रक्रिया व तंत्रज्ञान | २ |
| ३. | जलीय पर्यावरण व्यवस्थापन | २ |
| ४. | मत्स्य संपत्ती व्यवस्थापन | २ |
| ५. | मत्स्य पोषण व खाद्य तंत्रज्ञान | १ |
| ६. | मत्स्य विस्तार शिक्षण | २ |
| | **एकूण** | **११** |

## (ड) अन्नतंत्रज्ञान

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| | | वनामकृवि, परभणी |
| १. | अन्न विज्ञान व तंत्रज्ञान | १ |
| २. | अन्न अभियांत्रिकी | १ |
| ३. | अन्न रसायन व पोषणशास्त्र | १ |
| ४. | अन्न व्यापार व व्यवसाय व्यवस्थापन | १ |
| ५. | अन्न व औद्योगिक सुक्ष्मजीवशास्त्र | १ |
| | एकूण | ५ |

## (इ) कृषी जैवतंत्रज्ञान

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| | | डॉ. पंदेकृवि, अकोला |
| १. | कृषी जैवतंत्रज्ञान | ३ |

## (फ) कृषी अभियांत्रिकी

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी* | डॉ. पंदेकृवि, अकोला | वनामकृवि, परभणी | डॉ. बासाकोकृवि, दापोली | एकूण |
| १. | सिंचन व निचरा अभियांत्रिकी | ३ | २ | १ | २ | ८ |
| २. | मृद् व जलसंधारण अभियांत्रिकी | ३ | २ | १ | २ | ८ |
| ३. | प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी | -- | २ | १ | २ | ५ |
| ४. | कृषी शक्ती आणि यंत्रे | -- | २ | १ | २ | ५ |
| ५. | अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत | -- | २ | -- | २ | ४ |
| | **एकूण** | **६** | **१०** | ४ | १० | **३०** |

* प्रत्येक विषयातील एक जागा ही महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत असणा-या उमेदवारांतून भरण्यात येईल.

२.३.२ आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेचा विद्यापीठनिहाय गोषवारा.

| अ. क्र. | विद्याशाखा | मफुकृवि, राहुरी | डॉ. पंदेकृवि, अकोला | वना मकृवि, परभणी | डॉ. बासाकोकृवि, दापोली | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कृषी | ७२ | ३७ | ३३ | २० | १६२ |
| २. | गृहविज्ञान | -- | -- | २ | -- | २ |
| ३. | मत्स्यविज्ञान | -- | -- | -- | ११ | ११ |
| ४. | अन्न तंत्रज्ञान | -- | -- | ५ | -- | ५ |
| ५. | कृषी जैवतंत्रज्ञान | -- | ३ | -- | -- | ३ |
| ६. | कृषी अभियांत्रिकी | ६ | १० | ४ | १० | ३० |
| | **एकूण** | **७८** | **५०** | **४४** | **४१** | **२१३** |

टिपः-

- डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला (डॉ.पंदेकृवि) अंतर्गत आचार्य पदवी अभ्यासक्रमातील प्रत्येक विषयास प्रवेश क्षमतेंव्यतिरिक्त एक जागा डॉ.पंदेकृवि, अकोला या कृषी विद्यापीठातील सेवांतर्गत उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहे.
- डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत मत्स्यविज्ञान विद्याशाखेतील मत्स्य विस्तार शिक्षण या विषयाची एक जागा सेवांतर्गत कर्मचाऱ्यासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत कृषी विद्याशाखेतील सर्व विषयांना प्रवेश क्षमतेव्यतिरिक्त प्रत्येकी एक जागा सदर विद्यापीठांच्या सेवांतर्गत कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवण्यात आली आहे.
- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातंर्गत कार्यरत शैक्षणिक कर्मचाऱ्यांसाठी आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या कृषी, कृषी अभियांत्रिकी, अन्नतंत्र व गृहविज्ञान या घटक विद्याशाखेत अनुक्रमे ११ (प्रत्येक विषयात एक जागा), ४, ४, व १ अशा प्रवेश क्षमतेव्यतिरिक्त जागा आहेत.
- सेवांतर्गत उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागांवर प्रवेशोच्छुक सेवांतर्गत उमेदवाराने संबंधित कृषी विद्यापीठाचे कुलसचिव यांच्याकडे परस्पर अर्ज पाठवावा.
- तथापि, सेवांतर्गत कर्मचाऱ्यांसाठी राखीव असलेल्या प्रवेश क्षमतेंतर्गत रिक्त जागा जागेवरील प्रवेश फेरीपूर्वी कृषी विद्यापीठाने कृषी परिषदेस कळविल्यास अशा रिक्त जागा जागेवरील प्रवेश फेरीद्वारे भरण्यात येतील.

## ३. उमेदवारांसाठी सूचना :

३.१ प्रवेशासाठी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी उमेदवारांनी माहितीपत्रक आणि प्रवेश अर्ज यांचे काळजीपूर्वक वाचन करावे.

३.२ (i) प्रत्येक अर्जदाराने फक्त एकच प्रवेश अर्ज **maha-agriadmission.in** या संकेतस्थळावर **'ऑन लाईन'** पध्दतीने भरावा. सदर अर्जाचा नमुना

**www.mcaer.org** या संकेतस्थळावर तसेच सोबत **<u>'परिशिष्ट बी'</u>** मध्ये देण्यात आला आहे.

(ii) (अ) उमेदवाराने 'ऑन लाईन' प्रवेश अर्जाची प्रत मुद्रित करावी.

(ब) प्रवेश अर्जावर उमेदवाराने स्वाक्षरी करावी आणि प्रवेश अर्जासोबत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती (self attested copies) जोडाव्यात.

(क) **प्रदानाची पध्दती-**
**भारतीय स्टेट बँकेच्या शाखेमध्ये चलनाद्वारे** किंवा **डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, नेट बँकींगद्वारे** किंवा **धनाकर्षाद्वारे शुल्क भरावे. धनाकर्ष 'वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे' (Financial Advisor, MCAER, Pune) यांच्या नावे पुणे येथे देय असावा.** चलनाद्वारे शुल्क भरल्यास चलनाची छायाप्रत प्रवेश अर्जासोबत जोडावी.

(ड) **खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.२०००/- तर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१०००/- शुल्क आहे.**

(iii) **महाराष्ट्राबाहेरील सर्व गटातील उमेदवारांनी रु.२०००/- चे शुल्क भरावे.**

(iv) प्रवेश अर्जावर उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे **सध्याचे छायाचित्र चिकटवून** आवश्यक त्या स्वयंसाक्षांकित छायाप्रतींच्या कागदपत्रांसह 'कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८, महाराष्ट्र' या पत्त्यावर **टपालाने** अथवा कुरीयर सेवेमार्फत प्रवेश अर्ज पाठवावा.

**(v) उमेदवाराने एकापेक्षा जास्त प्रवेश अर्ज दाखल केल्यास शेवटचा परिपूर्ण भरलेला व प्राप्त झालेला प्रवेश अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.**

३.३ **उमेदवाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या मूळ कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित छायाप्रती (मूळ प्रती जोडू नयेत) पुढील क्रमाने जोडाव्यात.**

(अे) पात्रता परीक्षेचे गुणपत्रक / श्रेणी पत्रक.

(बी) (i) ज्या महाविद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे, ते महाविद्यालय सोडल्याचा दाखला किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असेल त्या महाविद्यालयाचे अधिकृत (Bonafide) प्रमाणपत्र.

(ii) महाराष्ट्र राज्याबाहेरील (Other State) उमेदवारांना महाविद्यालय सोडल्याचा दाखला (College Leaving Certificate) सादर करता येत नसेल, तर अशावेळेस त्या महाविद्यालयाकडील स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate).

(iii) मागील शैक्षणिक वर्षात राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत आचार्य पदवी शिक्षण घेत असलेल्या उमेदवाराने प्रथम वर्ष आचार्य पदवी अभ्यासक्रमासाठी पुनश्च अर्ज केल्यास, **चालू शैक्षणिक वर्षासाठी पहिल्या वर्षात प्रवेश घेण्याकरिता चालू शैक्षणिक वर्षापूर्वी प्रवेश घेतलेल्या संबंधित महाविद्यालयाचे 'बोनाफाईड प्रमाणपत्र'.**

(iv) अशा उमेदवारास प्रवेश दिल्यास त्यास/तीस महाविद्यालय सोडल्याचा दाखला / स्थलांतराचे प्रमाणपत्र तीन महिन्यांच्या आंत सादर करणे आवश्यक आहे. सदर दाखला विहित मुदतीत सादर न केल्यास त्याचा/तिचा प्रवेश रद्द होऊ शकेल.

(सी) महाराष्ट्र राज्यातील उमेदवार अथवा त्याच्या/तिच्या पालकांचे व इतर राज्यातील उमेदवारांसाठीसुध्दा सक्षम प्राधिका-याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले महाविद्यालय/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याकडील जन्म दाखला.

(डी) **सन २०१४-१५ किंवा २०१५-१६ या वर्षातील तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र**. या प्रमाणपत्राचा नमुना **परिशिष्ट 'सी'** येथे जोडला आहे. उमेदवार किंवा त्याचे / तिचे आई-वडील अथवा आजी/आजोबा (वडिलांचे आई-वडील) हे शेतजमीनधारक किंवा कूळ असून त्या जमिनीवरील शेतीव्दारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजीविकेचे प्रमुख साधन आहे, असे या प्रमाणपत्रामध्ये नमूद करणे आवश्यक आहे **किंवा तहसीलदार / नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.**

(इ) राज्यातील **सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.**

(एफ्) **विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, क, ड , इतर मागासवर्गीय जाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांनी** सक्षम अधिकाऱ्याचे **दिनांक १ एप्रिल,२०१६ रोजी किंवा त्यानंतर**

**दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दिला असेल, त्या दिनांकास ग्राह्य असलेले '<u>उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (Non Creamy Layer)' प्रमाणपत्र.</u>**

(जी) महाराष्ट्र राज्यातील <u>जिल्हा पुनर्वसन अधिकारी</u> <u>किंवा शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी</u> (प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पत्रासह) यांनी, उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याच्या/तिच्या वडिलांची / पालकांची किंवा आजोबांची **शेतजमीन महाराष्ट्रातील** कृषी विद्यापीठे/ पाटबंधारे/ वीज /संरक्षण **प्रकल्पासाठी संपादित केलेली / झालेली आहे, असे प्रमाणपत्र.** सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या **<u>प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्याला द्यावयाचा आहे, त्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.</u>**

(एच्) अर्जदाराच्या आई / वडिलांचे **स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे मा. पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र**. स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांचा मुलगा / मुलगी यांना या प्रमाणपत्राचा फायदा मिळेल; परंतु अशा परिस्थितीत **स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती/पत्नीचे रु. १००/- च्या मुद्रांकावर खालील मुद्यांचा समावेश असलेले प्रतिज्ञापत्र.**

(१) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा / मुलीचा मुलगा/ मुलगी आहे.

(२) **स्वातंत्र्यसैनिकाने या सवलतीचा उपयोग यापूर्वी कोणत्याही नातेवाईकासाठी केलेला नाही** आणि आता उपयोग केल्यानंतर तो पुढे करणार नाही.

वरील मुद्यांसंबंधात काही शंका, तक्रारी, अडचणी असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी प्रचलित शासन निर्णयाचा संदर्भ घ्यावा.

(आय) **उमेदवाराचे वडील, सैनिक असल्यास** तशा आशयाचे **जिल्हा सैनिक बोर्ड किंवा संबंधित तुकडीचा प्रमुख सेनाधिकारी यांचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र** अथवा **डिस्चार्ज प्रमाणपत्र.**

(जे) **सेवेत असणा-या उमेदवारांसाठी संबंधित नियुक्ती अधिकाऱ्याचे चालू शैक्षणिक वर्षासाठीचे 'ना हरकत प्रमाणपत्र'.**

(के) शारीरिकदृष्टया अपंगत्व प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने **प्राधिकृत अधिका-याचे** (जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळ) **अपंगत्वाबद्दलचे प्रमाणपत्र** जोडावे.

**उक्त स्वयंसाक्षांकित प्रतींसह त्यांच्या सत्यतेबाबत 'परिशिष्ट डी' येथील नमुन्यात स्वघोषणापत्र जोडणे अनिवार्य आहे.**

३.४ **सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात अधिसूचित केलेल्या शेवटच्या तारखेस किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेला अर्जच प्रवेशासाठी ग्राह्य धरला जाईल.**

३.५ मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी जनहित याचिका क्र.६३/२०१४ बाबत दि.२४.१२.२०१४ रोजी दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने तसेच याबाबत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयाच्या अधीन राहून अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी जात वैधतेबाबत खालील बाबींची पूर्तता करावी.

(१) अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी प्रवेश अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्राची स्वयंसाक्षांकित प्रत जोडावी **किंवा**

(२) ज्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडे 'जात वैधता प्रमाणपत्र' नाही व जात पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, अशा उमेदवारांनी जात पडताळणी समितीकडे प्रकरण सादर केले असल्याची अनुसूचित जमाती जात पडताळणी समितीच्या पोहोच पावतीची स्वयंसाक्षांकित छायाप्रत व रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवरील **परिशिष्ट- 'ई'** येथील हमीपत्राची छायाप्रत जोडावी.

अनसूचित जमातीचे जात प्रमाणपत्राबरोबरच उक्त (१) व (२) यापैकी एकाही मुद्याची पूर्तता न करणारे उमेदवार अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेल्या जागांवर प्रवेशास अपात्र असतील.

३.६ **खालीलपैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे प्रवेश अर्ज रद्द करण्यात येईल.**

**(अ) सक्षम प्राधिका-याने दिलेले <u>अधिवास प्रमाणपत्र</u> किंवा <u>जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र</u> किंवा <u>सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखल्याची स्वयंसाक्षांकित छायाप्रत</u> जोडली नसल्यास.**

**(ब) प्रवेश अर्जाच्या संगणकावरून काढलेल्या प्रतीवर <u>उमेदवाराने स्वतःची स्वाक्षरी</u> केली नसल्यास.**

(क) प्रवेश अर्जावर **पासपोर्ट आकाराचे <u>सध्याचे छायाचित्र चिकटविले</u> नसल्यास.**

(ड) **पात्रता परीक्षेचे <u>गुणपत्रक / श्रेणीपत्रकाच्या स्वयंसाक्षांकित छायाप्रती</u> जोडलेल्या नसल्यास.**

(इ) **महाविद्यालय सोडल्याचा दाखला / स्थलांतराच्या दाखल्याची स्वयंसाक्षांकित छायाप्रत अर्जासोबत जोडली नसल्यास,** (उमेदवाराने या प्रवेशापूर्वी दुसऱ्या आचार्य पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असेल तर त्या महाविद्यालयाने दिलेल्या बोनाफाईड प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जाईल; परंतु, मूळ महाविद्यालय सोडल्याचा दाखला प्रवेश घेतल्यापासून ३ महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.)

(फ) सेवेत असणा-या उमेदवाराने संबंधित **नियुक्ती प्राधिकाऱ्याचे चालू शैक्षणिक वर्षासाठीचे 'ना हरकत प्रमाणपत्र' जोडले नसल्यास.**

(ग) **प्रवेश अर्जाचे विहित शुल्क न भरल्यास.**

**(घ) स्वयंसाक्षांकित प्रतींच्या सत्यतेबाबत स्वयंघोषणा पत्र जोडले नसल्यास.**

३.७ **आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात गुणांच्या बाबतीत बरोबरी झाल्यास गुणज्येष्ठता (Merit) ठरविण्यासाठी खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येईल.**

(अ) महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाकडील आचार्य पदवी सामायिक प्रवेश परीक्षेचे अधिकतम् गुण

(ब) पदव्युत्तर परीक्षेतील **अधिकतम सीजीपीए.**

(ब) पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी लागलेले एकूण वर्ष आणि

(क) **वयाने मोठा** असलेला उमेदवार.

(ड) प्रथम ऑनलाईन प्रवेश अर्ज क्रमांक

३.८ **प्रवेशअर्ज सादर केल्यानंतर परिच्छेद ३.६ मध्ये नमूद केलेल्यापैकी कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.**

३.९ (१) उमेदवारांनी त्यांना पाहिजे असलेल्या महाविद्यालय / संस्थेमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्राधान्यक्रमाने अर्जामध्ये विकल्प नमूद करावेत. त्यासाठी संबंधित महाविद्यालय / संस्थेच्या सांकेतांकांचा वापर करावा.

(२) उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी **जास्तीत जास्त महाविद्यालय / संस्थांचे विकल्प** नमूद करावेत.

(३) **एकदा विकल्प नमूद केल्यानंतर विकल्पात बदल करण्याची विनंती विचारात घेतली जाणार नाही.**

३.१० (i) उमेदवाराने सर्व रकान्यांमध्ये अचूक माहिती भरावी.

(ii) उमेदवाराने भरलेल्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची **त्रुटी राहिल्यामुळे उमेदवाराची गुणवत्ता घसरल्यास, त्याबाबत 'केटीपीएल' किंवा कृषी परिषद जबाबदार राहणार नाही.**

३.११ अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर उपलब्ध जागा, प्राप्त गुण, लागू असलेले आरक्षण आणि इच्छुकांनी दिलेले विकल्प विचारात घेवून प्रवेश दिले जातील.

३.१२ उमेदवाराने दिलेल्या विकल्पानुसार **प्रथमतः राज्यस्तरावरील [ 'एम्' कोटा] उपलब्ध जागांमधून प्रवेशासाठी विचार केला जाईल. त्यानंतर विद्यापीठस्तरीय [ 'यु' कोटा] जागांवरील प्रवेशाबाबत विचार करण्यात येईल.**

३.१३ प्रवेशासाठी निवडलेल्या उमेद्‌वारांची 'एम्' कोटा व 'यु' कोटयातील गुणानुक्रमे यादी प्रवेश वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांकांना **www.mcaer.org** आणि **maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर प्रसिध्द केली जाईल.

३.१४ प्रवेश घेण्यासंबंधीच्या **उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना 'परिशिष्ट एफ'** मध्ये देण्यात आलेल्या आहेत.

३.१५ शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०११/(१०३) /११)/ मशि-३, दि.१८/४/२०११ नुसार उमेदवाराने प्रवेश घेतेवेळी स्वच्छताविषयक बाबींसबंधी **परिशिष्ट 'जी '** मध्ये माहिती देणे अनिवार्य आहे.

३.१६ प्रवेश प्रक्रियेविषयक **कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास इंग्रजी माहिती पुस्तिका ग्राह्य धरण्यात येईल.**

## ४. प्रवेश कार्यपध्दती :

४.१ उमेदवाराने प्रवेश प्रक्रियेसंबंधी माहितीपुस्तिकेत दिलेला सर्व मजकूर काळजीपूर्वक वाचावा.

४.२ 'केटीपीएल', पुणे यांच्यामार्फत कृषी परिषद, पुणे, राज्यातील कृषी विद्यापीठांकरिता प्रवेशप्रक्रिया राबवील.

**४.३** महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ च्या कलम ५ मधील तरतुदीनुसार आचार्य पदवी प्रवेशासाठी इच्छुक असणारे उमेदवार आणि त्यांच्या आई/वडिलांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य प्रवेश अर्ज दाखल करण्याच्या दिनांकाच्या १० वर्षे पूर्वीच्या कालावधीत किमान ३ वर्षे असणे आवश्यक असून असे उमेदवार प्रवेशासाठी पात्र समजण्यात येतील; तथापि, जे

उमेदवार आणि त्यांच्या आई / वडिलांचे वास्तव्य मागील १० वर्षांच्या कालावधीत तीन वर्षांपेक्षा कमी असेल, असे उमेदवार राज्याबाहेरील उमेदवार म्हणून समजण्यात येतील व त्यांच्याकरिता प्रवेशांच्या जागा प्रवेश क्षमतेच्या २ टक्क्यापर्यंत मर्यादित असतील.

**४.४ भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व इतर राज्यातील उमेदवारांसाठी असलेल्या राखीव जागा वगळता उर्वरित जागांपैकी-**

| | |
|---|---|
| **(अ) प्रथम महाराष्ट्रातील सर्व कृषी विद्यापीठातील उमेदवारांसाठी खुल्या जागा** | **५० टक्के जागा- ‘एम्’ कोटा.** |
| **(ब) नंतर महाराष्ट्रातील ज्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामधील महाविद्यालय/संस्था येथून उमेद्वार अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाला असेल, अशा उमेदवारांसाठी** | **५० टक्के जागा- ‘यु’ कोटा.** |

४.५ **महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळामार्फत घेण्यात आलेल्या आचार्य पदवी सामायिक प्रवेश परीक्षेतील प्राप्त गुणांच्या ७० टक्के गुण तसेच पदव्युत्तर पदवी परीक्षेतील प्राप्त गुणांच्या ३० टक्के गुण आणि अधिभार- Weightages (असल्यास) या आधारे आचार्य पदवी प्रवेशासाठी गुणवत्ता निश्चित करण्यात येईल.**

४.६ ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे किंवा ज्या उमेदवाराच्या महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याकडील जन्म दाखला आहे. मात्र त्याने पात्रता परीक्षा राज्याबाहेरून उत्तीर्ण केली आहे, अशा उमेदवाराचा प्रवेशासाठी विचार फक्त ‘एम्’ कोटयाकरिता करण्यात येईल.

**४.७ सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार आणि तात्पुरत्या स्वरुपाचे असतील.**

४.८ **पोस्टाच्या किंवा कुरिअरच्या विलंबास कृषी परिषद / ‘केटीपीएल’ जबाबदार राहणार नाही.**

४.९ (१) **maha-agriadmission.in** आणि **www.mcaer.org** या संकेतस्थळावर गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवार या संकेतस्थळावर गुणवत्ता यादी पाहू शकतील.

(२) **उमेदवारांना टपालाद्वारे त्यांच्या गुणवत्तायादीबाबत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.**

**४.१०** (१) गुणवत्ता यादीबाबत तक्रार असलेल्या अर्जदारांनी, प्रवेश कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या दिनांकाला किंवा त्या दिनांकापूर्वी त्यांच्या तक्रारी, त्यांच्या 'लॉग इन आय.डी.' व 'पासवर्ड'च्या आधारे 'ऑन लाईन'द्वारे सादर कराव्यात.

(२) **या मुदतीत उमेदवारांचा तक्रार अर्ज ऑनलाईनद्वारे प्राप्त न झाल्यास त्याचे/तिचे प्रकरण विचारात घेतले जाणार नाही.**

४.११ **(१) उमेदवाराने त्याचा 'लॉग इन', 'पासवर्ड' वापरून संकेतस्थळावरून त्याला देण्यात येणाऱ्या तात्पुरत्या प्रवेश वाटप पत्राची मुद्रित प्रत प्राप्त करून घेऊन प्रवेश दिलेल्या महाविद्यालयात स्वतः सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व सहपत्रांसह विहित दिनांकास अथवा त्यापूर्वी उपस्थित रहावे. अन्यथा असा उमेदवार प्रवेशास अनुपस्थित राहिला असे समजण्यात येऊन त्याचा प्रवेश रद्द समजण्यात येईल.**

**(२)** असा उमेद्वार त्यापुढील 'ऑनलाईन' प्रवेश फे-यांसाठी पात्र ठरणार नाही; मात्र 'जागेवर प्रवेश' या फेरीसाठी त्याचा / तिचा विचार केला जाऊ शकेल.

४.१२ अ) प्रवेश माहितीपुस्तिकेत नमूद केलेल्या तारखेस उमेदवाराला उपलब्ध रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल.

ब) **प्रवेशानंतर कोणत्याही वेळी, उमेदवाराने खोटी माहिती पुरवून प्रवेश घेतला आहे, असे आढळून आल्यास असा प्रवेश विद्यापीठ रद्द करील.**

क) एखाद्या प्रकरणी विद्यापीठाने अशी कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आल्यास असा प्रवेश रद्द करण्यासाठी महासंचालक, कृषी परिषद हे सक्षम असतील.

ड) प्रवेश फेऱ्यांच्या दरम्यान किंवा प्रवेशानंतर कोणत्याही वेळी संगणकप्रणालीमधील तांत्रिक बिघाडामुळे किंवा इतर कोणत्याही चुकीमुळे प्रवेश झाला असे आढळून आल्यास अशा उमेदवाराचा प्रवेश महासंचालक, कृषी परिषद हे रद्द करतील.

४.१३ (i) अतिरिक्त दिलेले गुण चुकीचे दर्शविले गेले असल्याचे प्रवेश घेतेवेळी मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या छाननीच्या वेळी निदर्शनास आल्यास, अशा उमेदवाराचा संबंधित महाविद्यालय / संस्थेतील प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही.

(ii) अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांनी याबाबतची वस्तुस्थिती 'केटीपीएल' / कृषी परिषद कार्यालय यांना ई-मेल, दूरध्वनी किंवा फॅक्सद्वारे तात्काळ कळवावी.

(iii) ‘केटीपीएल’ द्वारा अंतिम यादी पुन्हा सुधारित केल्यानंतर सदर उमेदवार त्याच्या प्राप्त गुणानुसार नवीन महाविद्यालय / संस्थेतील प्रवेशास पात्र राहील.

**४.१४ अंतिम प्रवेशानंतर एखाद्या उमेदवाराला प्रवेशाविषयी तक्रार करायची असल्यास ७ दिवसांच्या आत कृषी परिषदेचे महासंचालक यांच्याकडे उमेदवार तक्रार अर्ज दाखल करू शकेल.**

४.१५ विविध अभ्यासक्रमासाठी घेतलेला प्रवेश अंतिम राहील. प्रवेश घेतलेला असा उमेदवार विद्यापीठ / महाविद्यालय / अभ्यासक्रम / विषय यामध्ये कोणताही बदल करण्यास पात्र राहणार नाही.

४.१६ **जर कोणत्याही उमेदवाराची त्याचा / तिचा प्रवेश नाकारण्याची इच्छा असल्यास** आणि त्याच्या / तिच्याकडून पुढील प्रवेश फेरीसाठी विचार करावा असे वाटत असल्यास, त्याने / तिने राज्यातील कोणत्याही आचार्य पदवी महाविद्यालयात स्वतः प्रवेश नाकारण्यासाठीचा विहित नमुन्यातील अर्ज (**परिशिष्ट- ‘एच’**), रोख रु.२००/- इतके शुल्क भरून प्रवेश वाटप पत्रात नमूद केलेल्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी सादर करावा.

**४.१७ एखाद्या विद्यार्थ्याने रु.२००/- फी भरुन त्याचा / तिचा प्रवेश नाकारला नाही, तर त्याचा / तिचा ‘जागेवर प्रवेश फेरी’ या फेरीखेरीज नंतरच्या प्रवेश फेरीसाठी विचार केला जाणार नाही.**

**४.१८** प्रवेश वाट**पानुसा**र प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्याने प्रवेश रद्द / नाकारल्यास असा विद्यार्थी प्रवेश रद्द / नाकारलेला विकल्प वगळता पुढील ऑनलाईन प्रवेश फेऱ्यांद्वारे इतर विकल्पांकरिता प्रवेशासाठी पात्र असेल. प्रवेश नाकारण्यासाठी दिलेल्या कालावधीमध्ये प्रवेश रद्द करता येतील.

**४.१९ प्रवेश वाटपानुसार प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास असा विद्यार्थी प्रवेश रद्द केलेला विकल्प वगळता पुढील ऑनलाईन प्रवेश फेऱ्यांद्वारे इतर विकल्पांकरिता प्रवेशासाठी पात्र असेल. प्रवेश रद्द शुल्काचा परतावा खालीलप्रमाणे असेल.**

(i) प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास, विद्यार्थ्याकडून **प्रवेश प्रक्रिया शुल्कापोटी कमाल रू.१०००/- रक्कम कपात करण्यात येईल.**

(ii) **प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास वर्ग सुरु झालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क** (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून **वसूल करण्यात येईल.**

(iii) वर्ग सुरु झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याने नोंदणी करून प्रवेश रद्द केल्यास, **नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.**

४.२० प्रवेश प्रक्रियेसंबंधीची तसेच राज्यस्तरीय ('एम' कोटा) व विद्यापीठस्तरीय ('यु' कोटा) ची गुणवत्ता यादी आणि प्रवेश फेऱ्यांप्रमाणे प्रवेशासंबंधीची सद्यस्थिती याबाबतची माहिती **maha-agriadmission.in** आणि **www.mcaer.org** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

४.२१ प्रवेश प्रक्रियेसंदर्भात महाविद्यालय संस्थांचे अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांच्यासाठी महत्वाच्या सूचना **'परिशिष्ट आय'** येथे दिलेल्या आहेत.

४.२२ उमेदवाराचा दुर्लक्षितपणा, दिरंगाई, कोणत्याही प्रकारचे तांत्रिक बिघाड किंवा त्याच्या इतर खाजगी कारणांमुळे तो प्रवेशापासून वंचित राहिल्याबाबत **कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

## ५. राखीव जागांचा तपशील.

भारतीय राज्य घटनेतील तरतुदी, महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील तरतुदी, तसेच वेळोवेळी शासन निर्णयाद्वारे निर्देशित केल्याप्रमाणे विशिष्ट जागा, महाविद्यालय / संस्थांमधील प्रवेशासाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत-

| अ. क्र. | वैधानिक आरक्षण | टक्केवारी | अ. क्र. | सामाजिक आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती / नवबौध्द **(एस्सी)** | १३ | (१) | स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य **(एफ्एफ्)** | २.०० |
| (२) | अनुसूचित जमाती **(एस्टी)** | ०७ | (२) | अपंग (कमी दिसणे, कमी ऐकणे, चालणे, व्यंगत्व किंवा मणक्याचे व्यंगत्व) **(पीएच)** | ३.०० |
| (३) | विमुक्त जाती (अ) **(व्हीजे -ए)** (१४ व इतर) | ०३ | (३) | आजी व माजी सैनिकांची मुले **(डीपी)** | २.०० |
| (४) | भटक्या जमाती (ब) **(एन्टी-बी)** (१९९० पूर्वीच्या सूचीप्रमाणे २८ व इतर) | २.५ | (४) | प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले. **(पीएपी)** महाराष्ट्र प्रकल्प पुनर्वसन अधिनियम, १९७६ प्रमाणे प्रकल्पबाधित. | ४.०० |
| (५) | भटक्या जमाती (क) **(एन्टी - सी )** | ३.५ | (५) | शेतकरी व विहित किमान अर्हता असलेले किंवा कृषीविषयक अनुभव असलेली शेतक-यांची मुले. **(अेजी)** | ६.०० |
| (६) | भटक्या जमाती (ड) **(एन्टी - डी)** (वंजार, वंजारी, वंजारा) | ०२ | (६) | महिला उमेदवार | ३०.०० |
| (७) | इतर मागासवर्गीय **(ओबीसी)** | १९ | (७) | ज्या तारखेला प्रवेश मागितला असेल, त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या १० वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या व्यक्तीने व ज्याच्या आईवडिलांनी या राज्यात निवास केलेला नसेल, अशा व्यक्ती. (ओएस्) | २.०० |
| | एकूण | ५० | | | |

**टीप :**

५.१ इतर आरक्षणांतर्गत अ.क्र. १ ते ६ येथील विशेष आरक्षण खुला व वैधानिक आरक्षित संवर्गामध्ये समाविष्ट आहे.

५.२ इतर आरक्षणांतर्गत अ.क्र. ६ येथील महिलांच्या विशेष आरक्षणास त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सामान्य प्रशासन विभाग,

परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६/३/१९९९ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल. प्रस्तुत शासन परिपत्रक **परिशिष्ट 'जे'** येथे जोडले आहे.

५.३ 'विशेष मागास प्रवर्गीय' उमेदवारांची जात, सुरुवातीस ज्या 'इतर मागास प्रवर्गा'मध्ये समाविष्ट होती, त्या 'इतर मागास प्रवर्गा'च्या आरक्षणासाठी असा उमेदवार पात्र समजण्यात येईल.

५.४ महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे वरील आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात येईल.

५.५ प्रवेश प्रक्रियेदरम्यान एखाद्या आरक्षित संवर्गामध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा शासन निर्णय, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ मधील कार्यपध्दतीप्रमाणे भरण्यात येतील. सदर शासन निर्णय **परिशिष्ट- 'अे '** येथे दर्शविण्यात आला आहे.

५.६ जागांचे वाटप महाविद्यालयनिहाय व विषयनिहाय जागांचे वाटप करण्यात येईल.

## ६. अधिभार

फक्त 'नास' [NAAS , National Academy of Agricultural Sciences] च्या समायोजित यादीमध्ये नाव असलेल्या मासिकामध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनपर निबंध / टिप्पणीसाठी प्रत्येकी ०.०५, दहा बिंदू मापन मध्ये अतिरिक्त गुण देण्यात येतील. ज्या मासिकामध्ये संशोधनपर निबंध / टिप्पणी प्रकाशित झाली आहे, अशा मासिकाचे मुखपृष्ठ व अनुक्रमणिका जोडावी. शोधनिबंध नुकताच ऑनलाईन प्रसिध्द झालेला असल्यास संबंधित निबंध / टिप्पणी स्वीकृती पत्रासह (acceptance letter) जोडणे आवश्यक आहे.

**जास्तीत जास्त अतिरिक्त गुणांची मर्यादा ०.२४ पेक्षा जास्त असणार नाही.**

## ७. शिक्षण पध्दत :

❖ राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये 'विषय - अधिभार पध्दती'ने प्रत्येक शैक्षणिक वर्ष दोन सत्रांमध्ये विभागले आहे आणि २० आठवडयांपेक्षा कमी कालावधी नसलेल्या कालावधीस 'षण्मासिक सत्र' असे म्हणतात.

❖ शैक्षणिक कार्यक्रमामध्ये शिकविले जाणारे विषय निरनिराळया सत्रांमध्ये विभागले जाऊन वर्गातील व्याख्याने, प्रात्याक्षिके / शेतावरील प्रात्यक्षिके, ग्रंथालयातील वाचन व गृहपाठ इत्यादीप्रकारे शिकविले जातात.

❖ विद्यार्थी / विद्यार्थिनी, विषयाची निवड, घ्यावयाचे एकूण अधिभार, विद्यार्थ्याच्या सल्ला समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रचलित नियमाप्रमाणे आणि विद्यार्थ्यांची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती पाहून करतो / करते.

❖ विद्यार्थ्याची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती समाधानकारक नसेल तर तो काही विषय ज्या वेळी शिकविण्यासाठी उपलब्ध असतील त्या वेळी पुन्हा घेऊ शकतो / शकते.

❖ शैक्षणिक नियमावलीमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करून सुधारीत शैक्षणिक नियमावली तयार करण्यात येते. सुधारीत शैक्षणिक नियमावली शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना लागू असते.

## ८. नोंदणी

८.१ अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था किंवा महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता यांनी प्रवेश अर्ज आणि मूळ प्रमाणपत्रे तपासल्यानंतर विद्यार्थ्यास नोंदणी करण्यासाठी परवानगी देण्यात येते. या नोंदणीसाठी खालील बाबींचा क्रमशः समावेश होतो.

(१) अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्थेचे कार्यालय किंवा संबंधित महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता यांच्या कार्यालयात शुल्क भरणे .

(२) सल्लागार समिती आणि विभाग प्रमुख यांच्या सल्लामसलतीने विद्यार्थ्याची विविध विषयात नोंदणी.

(३) विषय नोंदणी फॉर्म पूर्ण करुन विद्यार्थी, प्राध्यापक, मार्गदर्शक आणि विभाग प्रमुखांच्या सहीनिशी त्याच दिवशी किंवा विहीत केलेल्या वेळेपर्यंत अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था किंवा संबंधित महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता यांचेकडे जमा करणे. अन्यथा विद्यार्थ्याची नोंदणी अवैध ठरविली जाते.

## ९. वैद्यकीय तपासणी

❖ प्रथम वर्षात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यास विद्यापीठ / अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांचे निर्देशानुसार जिल्हा शल्यचिकित्सक / ग्रामीण वैद्यकीय अधिकारी / प्राथमिक स्वास्थ्य केंद्र यांच्याकडून पहिले सत्र संपण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेणे अनिवार्य आहे.

- ❖ वैद्यकीय तपासणीत विद्यार्थ्यामध्ये व्यंग आढळून आल्यास संस्थेचे / महाविद्यालयाचे अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता संबंधित विद्यार्थ्यास आणि त्याच्या आई - वडील / पालक यांना वैद्यकीय सुधारणेसाठी कळवतील.
- ❖ **विद्यार्थी वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरल्यास त्यास विद्यापीठातून काढून टाकण्यात येईल.**
- ❖ अशी प्रकरणे कुलसचिव यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येतील.
- ❖ विद्यापीठ / अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांनी आयोजित केलेल्या वैद्यकीय तपासणीसाठी विद्यार्थी गैरहजर राहिल्यास विद्यार्थ्याला स्वखर्चाने प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करुन तपासणी अहवाल विहित केलेल्या मुदतीमध्ये महाविद्यालयास सुपूर्द करावा लागेल.
- ❖ **एखाद्या विद्यार्थ्याने वैद्यकीय तपासणी अहवाल विहित मुदतीत सादर केला नाही, तर अशा विद्यार्थ्याचा निकाल घोषित केला जाणार नाही.**

## १०. उपस्थिती

- ❖ प्रत्येक विद्यार्थ्यास वर्गात, प्रात्यक्षिक , ग्रंथालयातील काम, विस्तार शिक्षण संबंधी भेटी, शैक्षणिक सहली आणि प्राध्यापक व संबंधीत शिक्षक यांच्या बैठकीस हजर राहाणे आवश्यक आहे.
- ❖ **एखाद्या विद्यार्थ्याची हजेरी ८० टक्यापेक्षा कमी असल्यास त्याला त्या सत्राची परीक्षा देण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल** व त्या विषयात अनुत्तीर्ण असा शेरा दिला जाईल (एफ् ग्रेड).
- ❖ अशा विद्यार्थ्यास त्या विषयासाठी पुन्हा नोंदणी करावी लागेल.

## ११. खेळ आणि इतर कार्यक्रम

प्रत्येक महाविद्यालयात क्रीडा आणि त्यासंबंधी कार्यक्रम राबविण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

## १२. वसतीगृह

काही मर्यादित संख्येपर्यंत विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयांकडे वसतीगृहाची सोय उपलब्ध आहे. वसतीगृहाची सुविधा गुणवत्तेवर आधारीत आहे.

**१३. पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके.**

उच्चत्तम गुणवत्ताधारक पदव्युत्तर विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके देण्यात येतात.

**१४. शिष्यवृत्ती आणि सवलती.**

- आरक्षित प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती,
- आर्थिकदृष्टया मागास घटकाच्या विद्यार्थ्यास फ्री शिप,
- भारत सरकारची राष्ट्रीय कर्ज शिष्यवृत्ती,
- अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता व साधने भारत सरकार शिष्यवृत्ती तसेच
- गुणवत्ता व साधने शिष्यवृत्ती (महाराष्ट्र शासन)

इत्यादी शिष्यवृत्त्या दिल्या जातात.

**१५. वर्तणूक आणि शिस्त**

(१) विद्यापीठामध्ये वेळोवेळी सुधारित व अस्तित्वात असलेल्या नियम व विनियमानुसार कॉपी प्रकरणे आणि गैरवर्तणुकीची प्रकरणे हाताळली जातात.

(२) विद्यापीठ संवैधानिक नियमावली, १९९० मध्ये केलेल्या तरतुदीन्वये **महाविद्यालयातील विद्यार्थी, रॅगिंग, अपहरण आणि इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास त्या संस्था / महाविद्यालयाचे अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता पूर्वसूचना न देता महाविद्यालयातून तसेच वसतिगृहातून ताबडतोब निलंबित करतील** आणि अशा विद्यार्थ्यास उप महासंचालक (शिक्षण), पत्र क्र. ६(२९)/२००७ ए व पी. दि.१८/१/०८ नुसार **मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी विशेष याचिका अपील (सी) (सन २००४ चे (सी) [२४२९५ व २४२९६-९९] मध्ये दि. १०/१२/२००७ रोजी दिलेले आदेश** आणि कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्र. अेजीयु-२००९/प्र.क्र.५८/७-अे, दि.६/५/२००९ नुसार, **माननीय कुलगुरु यांच्या आदेशाप्रमाणे महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.**

(३) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने केलेल्या नियम व विनियमांचे पालन करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

(४) **कोणत्याहीप्रकारची बेशिस्त किंवा गैरवर्तणूक ही 'उच्च शिक्षण संस्थांमधील होणा-या रॅगिंगवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठ अनुदान अयोगाचे विनियमन,२००९' च्या तरतुदीनुसार शिक्षापात्र गुन्हा ठरते.**

(५) रॅगिंगविरोधी कायदा : रॅगिंगच्या प्रकरणामध्ये २४ X ७ रॅगिंगविरोधी कायदेशीर मदत मिळण्यासाठी **१८००-१८०-५५२२** या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. ई-मेलः'**helpline@antiragging.net**' आणि संकेतस्थळ : '**http://www.ugc.ac.in**'

(६) प्रत्येक विद्यार्थी आणि त्याचे आई-वडील / पालक यांनी **'उच्च शिक्षण संस्थांमधील होणा-या रॅगिंगवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठ अनुदान अयोगाचे विनियमन,२००९'** मधील तरतुदींचे आम्ही पालन करू,' असे **'परिशिष्ट के'** येथील प्रतिज्ञापत्र देणे गरजेचे आहे. तसेच आम्ही शैक्षणिक संस्थांमध्ये वसतीगृह परिसर आणि विद्यापीठ परिसरामध्ये शिस्त व वर्तणूक चांगली ठेऊ अशीदेखील खात्री देणे आवश्यक आहे.

## १६. शुल्क

**आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी भरावयाच्या शुल्काचा तपशील (रुपयांमध्ये)**

| अ. क्र. | बाब | सत्र १ | सत्र २ |
|---|---|---|---|
| | **अ) महाविद्यालय / संस्था शुल्क** | | |
| १ | शैक्षणिक शुल्क | १२००० | १२००० |
| २ | नोंदणी शुल्क | ५०० | ५०० |
| ३ | पात्रता शुल्क | ५०० / ८०० ⊗ | -- |
| ४ | हमी शुल्क | २०००© | -- |
| ५ | ग्रंथालय शुल्क | १००० | १००० |
| ६ | विद्यार्थी परीषद कार्यक्रमांतर्गत वर्गणी | | |
| | १) खेळ,जिमखाना व इतर उपक्रम | १००० | १००० |
| | २) विद्यार्थी सहकारी संस्था (भाग भांडवल + सभासद शुल्क) | २००# | -- |
| | ३) वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम | ८०० | -- |
| | ४) महाविद्यालय / संस्था नियतकालिक | ४०० | -- |
| | ५) 'क्रीडा महोत्सव' क्रीडा शुल्क | १०० | -- |
| ७ | वैद्यकीय तपासणी शुल्क | २०० | -- |
| ८ | ओळख पत्र | १००# | -- |

| अ. क्र. | बाब | सत्र १ | सत्र २ |
|---|---|---|---|
| ९ | विद्यार्थी मदत निधी | २००# | -- |
| १० | गुण पत्रिका शुल्क | २०० | २०० |
| ११ | परीक्षा शुल्क | ३५०० | - |
| १२ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | १०० | -- |
| १३ | प्रबंध तपासणी शुल्क | -- | ५००० |
| | एकूण (अ) | २२८०० + [३००⊗] | १९७०० |
| | **(ब) वसतीगृह** | | |
| १ | वसतीगृह हमी रक्कम | ३०००© | -- |
| २ | देखभाल खर्च | ३००० | ३००० |
| ३ | विद्युत देयक | ३००० | ३००० |
| ४ | खानावळ अनामत रक्कम | २००० | -- |
| | एकूण (ब) | ११००० | ६००० |
| | **एकूण (अ+ब)** | **३३८०० + [३००⊗]** | **२५७००** |

**टीप :**

⊗ इतर राज्यातील विद्यार्थ्यांनी भरावयाचे शुल्क.

© विद्यार्थ्यांनी महाविद्यालय /संस्था / वसतीगृह सोडतांनाचे परतावा शुल्क.

# हे शुल्क विद्यार्थ्यांच्या महाविद्यालय / संस्थेतील काळात एकदाच भरावयाचे आहे.

**विशेष सूचना :**

(१) उपरोक्त शुल्काव्यतिरिक्त शेवटच्या सत्राच्या नोंदणीच्या वेळी एकत्रित श्रेणीपत्रक / गुणपत्रक शुल्क रु.१००/- विद्यापीठाकडे जमा करावे लागेल.

(२) महाराष्ट्र शासनाच्या सवलतीच्या नियमाप्रमाणे विद्यार्थीनी आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणा-या सवलती या राज्य शासनाच्या वेळोवेळी सुधारित नियमाप्रमाणे दिल्या जातील.

(३) गुणपत्रिका / परीक्षा शुल्क संबंधित विद्यापीठात जमा करावे.

## १७. प्रवेश कार्यक्रम

१७.१ प्रवेश प्रक्रियेचे सन २०१६-२०१७ साठीचे वेळापत्रक.

| अ. क्र. | कार्यक्रम | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्जाची उपलब्धता | २९/०९/२०१६ |
| २. | ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावयाचा अंतिम दिनांक | ०५/१०/२०१६ |
| ३. | कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि. ('केटीपीएल'), पुणे यांच्याकडे अर्जाची मुद्रित प्रत व सर्व अनुषंगिक कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित छायाप्रती प्राप्तीचा अंतिम दिनांक | ०७/१०/२०१६ |
| ४. | केटीपीएल व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी दिनांक | ०९/१०/२०१६ |
| ५. | तक्रार नोंदणीचा अंतिम दिनांक. | १२/१०/२०१६ |
| ६. | केटीपीएल व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | १४/१०/२०१६ |
| ७. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी | १६/१०/२०१६ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | १८/१०/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ८. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | २०/१०/२०१६ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | २२/१०/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ९. | रिक्त जागांच्या यादीची प्रसिध्दी | २३/१०/२०१६ |
| १०. | जागेवर प्रवेश फेरी (**परिशिष्ट 'एल'** येथील कार्यपध्दतीनुसार) | २४/१०/२०१६ व २५/१०/२०१६ |
| ११. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | २४/१०/२०१६ |

**टीप :**

(१) **रविवारी तसेच शासकीय सुटीच्या दिवशी महाविद्यालय / संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रियाविषयक कार्यवाही चालू राहील.**

(२) दुस-या प्रवेश फेरीनंतर विविध कारणामुळे जागा रिक्त असल्यास त्या जागा 'जागेवर प्रवेश फेरी'तून संबंधित महाविद्यालय / संस्था यांच्यास्तरावर ‘केटीपीएल’ यांनी प्रसिध्द केलेल्या अंतिम गुणवत्ता यादीतून भरण्यात येतील.

(३) प्रवेश प्रक्रियेकरिता वेगळे मुलाखत पत्र देण्यात येणार नाही.

१७.२ या माहिती पुस्तिकेमध्ये विविध आचार्य पदवी प्रवेशाचे नियम तसेच शैक्षणिक नियमावलीच्या सर्व अभ्यासक्रमांची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. सविस्तर माहितीसाठी प्रवेशाचे नियम व विनियम तसेच शैक्षणिक नियमावली पहावी.

**१८. ’केटीपीएल’ चे संकेतस्थळ maha-agriadmission.in दि. २९ सप्टेंबर,२०१६ पासून कार्यरत राहील.**

**पुणे.**

**दिनांकः- २६/०९/२०१६**

**श्रीकांत काकडे**
**महासंचालक**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**पुणे.**

## प्रवेशाकरिता तपासावयाच्या कागदपत्रांची सूची

| अ. क्र. | बाब | होय / नाही |
|---|---|---|
| (१) | **(अ) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला.** | |
| | **(ब) इतर राज्यातील उमेदवारांचे अधिवास प्रमाणपत्र / रहिवाशी दाखला / जात, मूळ रहिवास व जन्मदाखला.** | |
| (२) | अर्हता परीक्षेचे गुणपत्रक किंवा श्रेणीपत्रक. | |
| (३) | महाविद्यालय / संस्था सोडल्याचे / महाविद्यालय / संस्था बदलीचे प्रमाणपत्र (शेवटी शिकत असलेल्या) किंवा जेथे प्रवेश अगोदर मिळालेला आहे त्या महाविद्यालय / संस्थेचे बोनाफाईड प्रमाणपत्र. | |
| (४) | राज्यातील पदनिर्देशित सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र. | |
| (५) | अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या उमेदवारासाठी राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले **'जात वैधता प्रमाणपत्र'** अथवा अनुसूचित जमाती जात पडताळणी समितीच्या पोहोच पावतीची छायाप्रत व रू.१००/- च्या स्टॅम्प पेपरवरील **परिशिष्ट- 'ई'** येथील हमीपत्राची छायाप्रत. | |
| (६) | दि. १ एप्रिल,२०१६ **किंवा त्यानंतर दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दाखल केला असेल, त्या दिनांकास ग्राह्य असलेले** उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडले आहे काय? | |
| (७) | (अ) मा. पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची स्वाक्षरी असलेले अर्जदाराच्या माता / पिता / आजी / आजोबा यांचे स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडले आहे काय? | |
| | (ब) **स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती/पत्नीचे रु.१००/- च्या मुद्रांकावरील प्रतिज्ञापत्र.** | |
| | (क) असल्यास, खालील बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत काय? | |
| | (१) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांच्या मुलाचा / मुलीचा मुलगा/ मुलगी आहे. | |
| | (२) स्वातंत्र्य सैनिकाने यापूर्वी कोणत्याही नातेवाईकासाठी ही सवलत घेतलेली नाही. | |
| | (३) यावेळी लाभ मिळाल्यास, यानंतर स्वातंत्र्य सैनिक कोणत्याही अन्य नातेवाईकासाठी ही सवलत घेणार नाही. | |

| अ. क्र. | बाब | होय / नाही |
|---|---|---|
| (८) | संरक्षण दलातील कर्मचारी असल्याबाबतचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र किंवा रेजिमेंटच्या समादेशक अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्राधिकाऱ्याचे 'सैनिक' असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडले आहे काय? | |
| (९) | सक्षम वैद्यकीय प्राधिका-याचे शारीरिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र. विकलांगतेची टक्केवारी शारिरीकदृष्टया अपंग प्रवर्गाकरिता आरक्षण मागणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत, ४० टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये. | |
| (१०) | लाभार्थ्यांच्या नावे असणारी, विद्यार्थ्यांच्या / विद्यार्थीनीच्या माता पित्याची अथवा आजोबा-आजीची जमीन कृषी विद्यापीठ / पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प यासाठी शासनाने संपादित केली असल्याचे विहित नमुन्यातील महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याने / किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने (प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पत्रासह) **'प्रकल्प विस्थापित व्यक्तीकरिता दिलेले प्रमाणपत्र (पीएपी.)'.** | |
| (११) | उमेदवार किंवा त्याचे माता-पिता किंवा आजा-आजी (पित्याकडून) शेतजमिनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे / आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तिक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसिलदार / नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिका-याचे विहित नमुन्यामध्ये / तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्ये सन २०१४-१५ किंवा २०१५-१६ या वर्षातील **'शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (एजी)'.** | |
| (१२) | फक्त 'नास' [NAAS , National Academy of Agricultural Sciences] च्या समायोजित यादीमध्ये नाव असलेल्या मासिकामध्ये प्रकाशित झालेले संशोधनपर निबंध / टिप्पणी. (मासिकाच्या मुखपृष्ठ व अनुक्रमणिकेसह) शोधनिबंध नुकताच ऑनलाईन प्रसिध्द झालेला असल्यास संबंधित निबंध / टिप्पणी स्वीकृती पत्र. (acceptance letter) | |
| (१३) | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबंधित नियुक्ती अधिकाऱ्याचे **चालू शैक्षणिक वर्षासाठीचे 'ना हरकत प्रमाणपत्र'.** | |
| (१४) | **स्वयंसाक्षांकित प्रतींच्या सत्यतेबाबत परिशिष्ट 'डी'** मधील **स्वयंघोषणा पत्र.** | |
| (१५) | स्वच्छताविषयक सुविधांबाबत **परिशिष्ट 'जी '** मधील हमीपत्र. | |